दै. देशोन्नती दि. 03/02/2025

# समाजाच्या कार्यात राजकारण आणू नये- मंगाराणी अंबुलगेकर

## मन्नेरवारलू महिला सखीमंच हळदी-कुंकू स्नेहसंमेलन उत्साहात




देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : आदिवासी मन्नेरवारलू समाजाच्या कार्यात मोठ्या प्रमाणात राजकारण होत असल्यामुळे समाज एकत्र करता येत नाही, त्यामुळे समाजाच्या कार्यात राजकारण आणू नये, असे प्रतिपादन माजी जि.प.अध्यक्षा मंगाराणी अँबुलगेकर यांनी केले. त्या मन्नेरवारलू महिला सखी मंच नांदेडच्यावतीने आयोजित हळदी-कुंकू कार्यक्रम व महिलांचा स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलत होत्या.

रविवारी शहराती बिरसामुंडा चौकातील एका हॉटेलात हळदी -कुंकू व मन्नेरवारलू समाजातील महिलांचा स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात महिलांसाठी संगित खुर्ची व हात न लावता बिस्कीट खाणे या स्पर्धा घेण्यात आल्या तसेच या कार्यक्रमात सामाजिक बांधलिकी जपत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात अनेकांनी रक्तदान केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदिवासी समाजाचे जननायक क्रांतीसुर्य बिरसा मुंडा व क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व दिप प्रज्वलंन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि.प. अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर या होत्या. तर प्रमुख उपस्थिती म्हणून स्काऊट गाईडच्या जिल्हा कमिशनर भागीरथी बच्चेवार, सेवानिवृत्त उप मुख्याध्यापिका ललिता कोलेवाड, नागज्योती पडगलवार, मीनाक्षी उन्हाळे, डॉ.शितल सिध्देवाड, डॉ.अपर्णा तोटावाड, डॉ.मयुरी कलेटवाड, डॉ.स्वाती आंदेलवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले महाराष्ट्र राज्य शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल मीरा परोडवाड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुढे बोलतांना सौ.अंबुलगेकर म्हणाल्या की, समाजाच्या कार्यक्रमात जेव्हा कधी मला बोलविले जात त्यावेळी समाजासाठी मी अवर्जुन उपस्थित राहाते परंतु मागील कांही वर्षापासून समाज कार्यात होत असलेल्या राजकारणामुळे समाजाचे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत समाजातील महिलांना एकत्र करुन मन्नेरवारलू सखी मंचाने हळदी-कुंकू स्नेहसंमेलन आयोजित करुन त्यात रक्तादन शिबीर घेवून पुन्हा एकदा समाजातील महिलांना एकत्र आणले. हे कौतूकास्पद कार्य असल्याचे त्या म्हणाल्या. सदरील कार्यक्रमाचे आयोजन मन्नेरवारलू संखी मंच नांदेडच्या सौ. सुचिता गंदपवाड, सौ. ललिता बोलमवाड, पद्मिन कासेवाड, सौ. शिवकांता कोरडवार, सौ. राजश्री उन्हाळे, सौ. स्मिता ठक्करवाड, सौ. मंजुषा पुपलवाड, सौ. मीनाक्षी बौडले यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी आदिवासी मन्नेरवारलू समाजातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुचिता गंदपवाड यांन केले तर सुत्रसंचलन मिरा पुरडवाड यांनी तर आभार अंजना आनमवाड यांनी मानले.